## जगभर हिंडताना...

## विविधतेने नटलेला.... मध्यप्रदेश

मध्यप्रदेश त्याच्या नावाप्रमाणेच भारताच्या मध्यभागी आहे. भारताचे ह्रदय असे त्याचे वर्णन करता येईल. आपला देश मुळामध्ये खंडप्राय, त्यातील मध्यप्रदेश हे सर्वात विशाल राज्य आहे. त्याचे एकूण क्षेत्र जवळजवळ साडेचार कोटी मीटर्सचे आहे. बिहार, ओरिसा, उत्तरप्रदेश, आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, गुजरात आणि राजस्थान अशा एकूण ७ राज्यांना त्याच्या सीमा भिडलेल्या आहेत. हया प्रदेशात विंध्य आणि सातपुडा पर्वतांच्या रांगा पसरलेल्या आहेत. नर्मदा व तापी हया नद्या तेथे उगम पावतात व पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहत जातात तर चंबळ, महानदी, इंद्रावती या नद्या पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहतात. पर्वत, सरोवरे, तळी यांमुळे या प्रदेशाला नैसर्गिक पार्श्वभूमी लाभली आहे. येथील जुने राजवाडे, स्तुप, शिल्प असलेली मंदिरे, किल्ले पाहिले म्हणजे येथील पराक्रमी वीर कलाकार कवी आणि संगीत यांच्याबद्दल कुतूहुल निर्माण होते. सुप्रसिद्ध संस्कृत नाटककार कालिदास हा उज्जैनचा तर मुघल दरबारातील संगीत सम्राट तानसेन ग्वाल्हेरचा आजही त्यांच्या स्मरणार्थ कालीदास समारोह आणि तानसेन संगीत महोत्सव साजरे केले जातात. शिल्पनगरी खजुराहो येथील वार्षिक नृत्योत्सव हेही मध्यप्रदेशचे वैशिष्टय आहे.
असा विविधतेने नटलेला मध्यप्रदेश पहायचा तर पंधरवडा तरी द्यायला हवा.

## विज्ञानजगत

### आपण जांभई का देतो ?



आपण अहेतूपूर्वक जेव्हा दीर्घ श्वास घेतो, तेव्हा त्यास जांभई म्हणतात. जेव्हा आपण थकतो, तेव्हा मेंदूकडे होणा-या रक्त पुरवठयाचा वेग मंदावतो. पुरेसा प्राणवायु मिळत नाही. रक्तातील कार्बनडायऑक्साईडचे प्रमाण वाढते. त्यामुळे प्रतिक्षिप्त क्रियेने आपण जांभई देतो. त्यायोगे तोंडाचा मोठा आ ऽऽ करीत अधिक प्रमाणात प्राणवायु आत घेतो. त्यामुळे मेंदूला नवी चेतना मिळते.

**सुविचार :** ज्ञान म्हणजे केवळ स्वतःच्या आनंदाची वा मोक्षाची साधना नसून लोकांच्या हिताचाच त्यात अंतर्भाव असतो.

**श्लोक :** अभिवादन शीलस्या। नित्या वृद्धोयसेविजः।
चत्वारि तस्य वर्धन्ते। आयुर्विद्यायशोबणम।।

**अर्थ :** आई-वडिल, थोर व्यक्तींना नमस्कार केल्याने त्यांचा आदर केल्याने आयुष्य, विद्याभ्यास, यश, बल या चार गोष्टी वृद्धींगत होतात.

**म्हणी :** तहान लागल्यावर विहीर खणणे     दे रे हरी पलंगावरी

गंमतकोडी उत्तरे - १) सूर्यमाला २) अधातू ३) विशेषण ४) क्रियापद





## नैमित्तिक

## मकरसंक्रांत

सुखप्राप्त आणि दुःख निवारण्यासाठी नीतीधर्म, आचारधर्म, संस्कार, व्रतवैकल्ये सणवार गोष्टी पाळण्यास हिंदू धर्मात सांगितले आहे.
संक्रांत हे व्रत आहे. इंग्रजी महिन्यांप्रमाणे १४ जानेवारीला आणि भारतीय महिन्यांप्रमाणे पौषात हा सण येतो. या महिन्यापासून थंडी कमी होऊ लागते. या दिवशी सूर्याचा मकर राशीत प्रवेश होतो. म्हणून या दिवसाला मकर संक्रांत असे म्हणतात.

हा सण जसा धार्मिक आहे तसा तो आरोग्य रक्षणाचा पण आहे. शरीर स्वास्थ्याचे रक्षण करण्याकरता आपल्या पूर्वजांनी या सणाची मोठ्या मार्मिकतेने योजना केली आहे. आपले मन तिळाप्रमाणे स्नेहपूर्ण व वाणी गुळासारखी मधूर असावी. तिळतिळ झटावे लागते, तेव्हा कुठे प्रतिष्ठा प्राप्त होते. म्हणून तिळगुळाचे महत्व या प्रसंगी सांगितले आहे.

## प्रजासत्ताक दिन- २६ जानेवारी

स्वातंत्र्यदिनाप्रमाणे प्रजासत्ताक दिन हा एक राष्ट्रीय उत्सव मानला जातो. या दिवशी देशभर आनंदाचे वातावरण असते. या दिवसाला गणराज्यदिन म्हणूनही संबोधले जाते. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले, या देशाची राज्यव्यवस्था कशी ठेवावी, कोणते नियम असावेत, कशा पद्धतीने ते नेहमी वापरले जावेत, लोकांच्या सुखसोईसाठी कोणत्या योजना असाव्यात, या बाबतीत सर्व पुढारी नेते मंडळींनीएक योजना करण्याचे ठरविले. या घटना समितीने भारतीय राज्यघटनेचा मसुदा तयार करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली लेखन समिती नियुक्त केली.

मागील अंकातील कोडयाचे उत्तर

| | | |
|---|---|---|
| ३ | १७ | ७ |
| १३ | ९ | ५ |
| ११ | १ | १५ |

२- कॅरमबोर्ड



या जगात कुठलीच गोष्ट कायम स्वरुपी राहत नाही, तुमचं दुःख सुद्धा.

कुणावाचून कोणाचे काहीच अडत नाही, हे जरी खरे असले तरी कोण कधी उपयोगी पडेल हे सांगता येत नाही. डोकं शांत असेल तर निर्णय चुकत नाही, अन भाषा गोड असेल तर माणसं तुटत नाहीत. - चार्ली चॅप्लिन

## राष्ट्रीय प्रतिज्ञा कोणी लिहीली?

देशभरातीलशालेय पाठ्यपुस्तकामध्ये सर्वत्र एक समान प्रतिज्ञा प्रत्येक विषयाच्या पुस्तकामध्ये सुरुवातीलाच दिलेली असते. आपण नित्याचा परिपाठ म्हणून शाळा भरताना ही प्रतिज्ञा घेत आलो आहोत. परंतू ही प्रतिज्ञा कोणी लिहीली कधी लिहीली ती केव्हापासून देशातील पाठ्यपुस्तकांमध्ये आली याची माहिती जवळपास कुणालाच नाही.

आंध्रप्रदेशातील सुप्रसिद्ध तेलगू साहित्यिक पेदेमेरी व्यंकट सुब्बाराव यांनी मुळात १९६२ मध्ये तेलगू भाषेत ही प्रतिज्ञा लिहीली होती. संस्कृत, इंग्रजी आणि अरेबिक भाषांमध्ये पदव्युत्तर पदवीपर्यंतचे त्यांचे शिक्षण झाले होते. विशाखापट्टणम या जिल्ह्याचे अनेक वर्ष जिल्हा कोषागार अधिकारी म्हणून सरकारी नोकरीत होते. स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतलेले कवी पेदेमेरी व्यंकट सुब्बाराव यांनी आपल्या जिल्ह्यातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांना म्हणावी म्हणून एक प्रतिज्ञा सन १९६२ मध्ये लिहीली. आंध्रप्रदेशचे तत्कालीन शिक्षणमंत्री पी.व्ही.जी राजू यांच्याकडे ही प्रतिज्ञा पाठविली. त्यांनी ही प्रतिज्ञा शाळांमध्ये घेण्याचा आदेश दिला.

राष्ट्रीय प्रतिज्ञा देशपातळीवर स्विकारण्याचा निर्णय "डेव्हलपमेंट ऑफ एज्युकेशन इंडिया" या समितीत घेण्यात आला. ही प्रतिज्ञा देशपातळीवर २६ जानेवारी १९६५ पासून सर्वत्र लागू करण्यात आली. या प्रतिज्ञेचे देशपातळीवर विविध भाषांमध्ये भाषांतर करण्यात आले आहे.

## गंमतकोडी



१. एक सूर्य, आठ ग्रह त्या ग्रहाचे, येतात उपग्रह खुप लघुग्रह, अनेक धूमकेतू यांच्या समूहास काय म्हणणार तुम्ही ?


२. चकाकी नसते, तन्यता नसते, यांची घनता कमीच असते, उष्णता, वीजेचे हे दुर्वाहक असतात.. या मुलद्रव्याला काय बरं म्हणतात ?

३. उंच पर्वत, हिरवी पाने, ओल्या मातीत, मधुर गाणे नामाबद्दल ही विशेष माहिती सांगणा-या शब्दाला काय बरं म्हणतात ?

४. अन्न खातो, पाणी पितो, खेळ खेळतो, गाणी गातो. वाक्याचा अर्थ जो पूर्ण करतो. क्रियावाचक शब्दाला त्या, काय बरं म्हणतो ?

सुचना : उत्तरे याच अंकात इतरत्र

**फजिती :**



फणसाच्या अंगी होते काटे, कैरीला त्याची गंमत वाटे
तिने फणसाला मुरडले नाक, नाकाला आला कायमचा बाक
कैरी पाहून सीताफळ हसले, हसले तर त्याचे दातच दिसले !

शांता शेळके

सदर त्रैमासिक प्रगती विद्यामंदीर, भांडुप तर्फे प्रकाशित करण्यात आले आहे.



प्रगती मंडळ, साईहिल संचालित
प्रगती विद्या मंदीर
नरदास नगर, भांडुप, मुंबई
सा विद्या या विमुक्तये

# प्रगतीपर्व

वर्ष -१ अंक-४ जानेवारी-२०१९

## हितगुज....

लेखन हे मुलांच्या अभिव्यक्तीचं एक उत्तम साधन आहे. मुलांच्या अंतरंगात डोकावून बघण्याची संधी लेखनातून मिळते. भाषिक सौंदर्याचा आनंद घेऊन त्याचा वाक्यात उपयोग करता येणं आणि प्रमाणभाषेचा औपचारिक स्वरुपात वापर करता येणं ही भाषा शिक्षणाची काही सर्वसाधारण उद्दिष्टे आहेत. ही उद्दिष्टे साध्य करण्याचे काम प्रगतीपर्व करत आहे.

प्रगतीपर्व या त्रैमासिकात शालेय घडामोडी सांस्कृतिक कार्यक्रम, विविध स्पर्धा, शब्दकोडी, दिनविशेष माहिती, असे विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व त्यांच्यावर चांगले संस्कार घडावे हा प्रगतीपर्वाचा मुख्य हेतू आहे.

**सौ. रश्मी सावंत**

## शाळेतील घडामोडी :

- ८ सप्टेंबर रोजी गणेशउत्सवाच्या निमित्ताने विविध स्पर्धा स्मरणशक्ती, पर्यावरण विषयक रांगोळी, मातीपासून गणपती तयार करणे, मेहंदी अशा स्पर्धा आयोजित करुन मुलांच्या बुद्धीमतेचा विकास व्हावा यासाठी प्रयत्न केला.
- तमसो मा ज्योतिर्गमय अंधाराकडून प्रकाशाकडे नेणारा दिवाळी हा सण सगळयांना हवाहवासा वाटणारा सण. आपल्या शाळेत विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन साजरा करण्यात आला. या दिवशी विद्यार्थ्यांनी पणत्या, आकाशकंदील, भेटकार्ड स्वतः तयार केली.
- डॉ. अब्दुल कलाम यांचे प्रगत भारताचे स्वप्न साकारण्यासाठी त्यांचा जन्मदिन १५ ऑक्टोबर हा वाचनप्रेरणा दिन म्हणून विद्यार्थ्यांकडून वाचन करुन साजरा केला.
- आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय भारत सरकार लसीकरण मोहिमेअंतर्गत ९ महिने ते १५ वर्ष वयोगटातील बालकांना एम.आर. ची लस टोचण्यात आली. गोवरचे दूरीकरण आणि रुबेलावर नियंत्रण ठेवण्याचा दृढनिश्चय केला आहे. या राष्ट्रव्यापी अभियानात आपल्या शाळेने सक्रीय सहभाग घेतला.
- कै. विश्वनाथ विठोबा पाटील सर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दरवर्षी आंतरशालेय कबड्डी स्पर्धा आयोजित केली जाते.यंदा १५ जानेवारी २०१९ रोजी पराग शाळेच्या पटांगणात घेण्यात येईल.